MHBU040012512022

| | |
|---|---|
| दाखल तारीखः | ०७.१०.२०२२ |
| नोंदणी तारीखः | ०७.१०.२०२२ |
| निकाल तारीखः | १९.०७.२०२३ |
| कालावधी | ०वर्षे, ९ महिने, १२ दिवस |

**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ खामगांव यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारीः लक्ष्मीकांत अ. बिडवई)

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६७/२०२२** निशाणीः

१. श्रीमती राखी ओमप्रकाश उजवणे
वय – २४ वर्ष, धंदा - शेती व व्यापार

२. श्रीमती सुमन अरुणराव उजवणे
वय – ६६ वर्ष, धंदा - घरकाम,

दोघे रा. अंदुरा, ता. बाळापूर
जिल्हा- अकोला .. अर्जदार

-विरुध्द-

निरंक ..गैरअर्जदार

**हिंदु अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६ च्या कलम ८ अन्वये अज्ञानाची नावे असलेली मालमत्ता विक्री करण्याची परवानगी मिळणेसाठी अर्ज.**

---

अर्जदारांकरीता श्री. पी. जी. भैय्या, विधिज्ञ
गैरअर्जदारा करीता - निरंक

न्यायनिवाडा
(अधिघोषणा दिनांक १९ जुलै, २०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज हिंदु अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६ च्या कलम ८ अन्वये अज्ञान नामे पर्ल ओमप्रकाश उजवणे, वय ०६ वर्ष व सुर्या ओमप्रकाश उजवणे, वय ०४ वर्ष यांची स्थावर मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्यासाठी अज्ञानांची नैसर्गिक पालनकर्ता व आई नामे राखी ओमप्रकाश उजवणे व आजी नामे सुमन अरुणराव उजवणे यांनी दिलेला आहे. आईच्या हयातीत आजी ही अज्ञानांची नैसर्गिक पालनकर्ता होऊ शकत नाही म्हणून हा अर्ज केवळ आई राखी ओमप्रकाश उजवणे यांच्या मार्फत गृहीत धरण्यात येत आहे.

०२. थोडक्यात कथन असे आहे की, विक्रीची परवानगी मागितलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन, भुखंड क्र.६, क्षेत्रफळ ३०५.६० चौ. मि. म्हणजेच ३२८८.२५ चौ. फुट ज्याचा नगर परिषद मालमत्ता क्र. झेड१डब्लु १२००३१११ असा आहे व सदर मिळकत शेगांव नगर परिषदेच्या हददीत जुना वार्ड क्र.१२ मध्ये स्थित आहे. सदर स्थावर मालमत्ता ओमप्रकाश अरुण उजवणे, योगेश नरेंद्रराव खोंड व विवेक प्रभाकर घोडेराव यांच्यामध्ये सामाईक होती. परंतू ओमप्रकाश अरुण उजवणे यांचा मृत्यु दिनांक २६/८/२०१९ रोजी झालेला आहे. ओमप्रकाश यांच्या मृत्युनंतर दोन्ही अर्जदार व दोन अज्ञान हे ओमप्रकाश यांचे कायदेशिर वारस या नात्याने उपरोक्त भुखंडात ओमप्रकाश यांच्या हिश्यापुरते मालक झालेले आहेत. परंतू ओमप्रकाश यांच्या मृत्युनंतर अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे यांना उत्पन्नाचे साधन नाही. जेव्हा की दोन्ही अज्ञान यांच्या संगोपनाची व शिक्षणाची जिम्मेदारी ही अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे यांच्यावर आहे.

०३. जेव्हा की अज्ञान पर्ल व सुर्या यांना उच्च शिक्षण देण्याची अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे हिचा मानस आहे परंतू आर्थीक विवंचनेमुळे अर्जदार

अज्ञानांना उच्च शिक्षण देवू शकत नाही, त्यामुळे अज्ञान पर्ल व सुर्या यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी आणि संगोपनासाठी उपरोक्त जमीन विक्रीची परवानगी देण्यात यावी.

०४. दैनिक मातृभुमी दिनांक १४/१०/२०२२ या वर्तमान पत्रात जाहीरात देवून या अर्जाबाबत कोणास आक्षेप असल्यास मागविण्यात आले. परंतू आज पर्यत कोणीही या अर्जास आक्षेप नोंदविलेला नाही. दैनिक मातृभुमी वर्तमान पत्राची प्रत व जाहीरात दिल्याबाबतची पावती अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहे.

०५. अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे हिने नि.०९ अन्वये स्वतःचा व निशाणी १२ अन्वये विवेक प्रभाकर घोडेराव यांचा तोंडी पुरावा दिलेला आहे आणि त्यासोबत अज्ञान पर्ल, अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे, सुमन अरुणराव उजवणे यांच्या आधार कार्डच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे उपरोक्त नमुद भुखंड क्र. ६ विवेक प्रभाकरराव घोडेराव, योगेश नरेद्रराव खोंड यांना रुपये ७,१५,०००/- एवढया किंमतीस विक्री करण्याबाबत केलेल्या सौदेपत्राची नक्कल, ओमप्रकाश उजवणे यांचे मृत्युप्रमाणपत्राची नक्कल, ओमप्रकाश उजवणे यांनी अन्य सहकाऱ्यासोबत उपरोक्त भुखंड क्र.६ खरेदी केल्याबाबतची नक्कल म्हणजेच खरेदीखत क्र.१७९२/२०१४ व खरेदीखत क्र.६७/२०१७ च्या नकला दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बाळापूर यांनी किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५/२०२० मध्ये वितरीत केलेले वारसा प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

०६. अर्जदाराचा तोंडी पुरावा म्हणजेच अर्जदाराचे पुर्नकथन आहे. जेव्हा की आधार कार्डच्या प्रमाणित प्रती यावरून पर्ल हिची जन्म तारीख २८/१०/२०१६ व सुर्या याचा जन्म तारीख १०/५/२०१८ अशी आहे म्हणजेच

ते दोघेही अज्ञान आहेत. अर्जदार ही अज्ञानाची नैसर्गिक आई असल्याबाबत विवाद नाही. अभिलेखावरील कागदपत्राच्या आधारे ओमप्रकाश उजवणे यांच्या मृत्युनंतर सुमन अरुणराव उजवणे, राखी ओमप्रकाश उजवणे व अज्ञान पर्ल, सुर्या हे उपरोक्त भुखंड क्र.६ याचे संयुक्त मालक असल्याचे निष्पन्न् होते.

०७. अर्जदाराने शपथेवर दिलेल्या पुराव्यावरून असे दिसते की आई या नात्याने ती दोन्ही अज्ञान यांना उच्च शिक्षण देवू इच्छित आहे परंतू त्याकरीता तिच्याकडे पुरेशे आर्थीक बळ नाही. जेव्हा की आजच्या युगात उज्वल भवितव्यासाठी उच्च शिक्षण हे आवश्यक आहे. अज्ञानाची आई राखी ओमप्रकाश उजवणे हिच्या हेतूबाबत शंका घेण्याचे कोणतेही कारण सद्य परिस्थीतीत दिसून येत नाही. म्हणून उपरोक्त भुखंड क्र. ०६ यातील अज्ञांनाचा अविभाजीत हिस्सा विकण्यास अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे हीस परवानगी दिल्यास अज्ञानांच्या उज्वल शैक्षणिक भवितव्याची नांदी ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

(१) अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) अर्जदार क्र.१ राखी ओमप्रकाश उजवणे हिस स्थावर मालमत्ता भुखंड क्र.६, क्षेत्रफळ ३०५.६० चौ. मि. म्हणजेच ३२८८.२५ चौ. फुट मधील अज्ञान पर्ल ओमप्रकाश उजवणे व सुर्या ओमप्रकाश उजवणे यांचा अविभाजीत हिस्सा विक्री करण्यास परवानगी देण्यात येते.

(३) उपरोक्त प्रमाणे अज्ञानांची स्थावर मिळकत विक्री करत असतांना बाजार मुल्यांपेक्षा कमी मुल्यांस विक्री होणार नाही याची काळजी अर्जदार राखी ओमप्रकाश उजवणे हया घेतील तसेच प्राप्त झालेला मोबदला केवळ अज्ञान पर्ल व सुर्या

यांच्या शैक्षणिक कामासाठी व संगोपनासाठीच केला जाईल अशी हमी लेखी स्वरुपात राखी ओमप्रकाश उजवणे यांनी या न्यायालयास दयावी, असे न करता उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्री केल्यास सदर व्यवहार कायदेशिर समजल्या जाणार नाही.

(४) या आदेशाबाबत सबंधीत विक्री पत्रात माहीती नमुद करण्यात यावी.

(५) अर्जदारांनी सदर प्रकरणाचा खर्च स्वतः सोसावा.

न्यायनिर्णय खुल्या नयायकक्षात घोषित करण्यात आला.

LAXMIKANT ANANTRAO BIDWAI

Digitally signed by LAXMIKANT ANANTRAO BIDWAI
Date: 2023.07.19 17:36:10 +0530

दिनांक :१९-०७-२०२३

( लक्ष्मीकांत अ. बिडवई )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१,
खामगांव

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, पीडीएफ संचीकेमधील न्यायनिवाडयाचा मजकूर हा मूळ न्यायनिवाडयाप्रमाणे तंतोतंत बरोबर व खरा आहे.

लघुलेखकाचे नांवः सी. एन. महाले, ग्रेड.२
न्यायालयाचे नांवः तदर्थ जिल्हा न्यायालय क्र.१, खामगांव.
अपलोड दिनांकः १९-०७-२०२३